**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**
**३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५**

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

जा. क्र. NDKSP-१६०२४(१३)/६/२०२५-१६/E- २१०९६८५/कृ. अ. दि. ०४/०८/२०२६

**प्रति,**

१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)
२. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

**विषय :** नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (टप्पा-२) अंतर्गत सूक्ष्म सिंचन घटकाच्या अंमलबजावणीबाबत.
**संदर्भ :** १. सूक्ष्म सिंचन मार्गदर्शक सूचना क्र. NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT, दि. २८/१०/२०२५.
२. संचालक फलोत्पादन,कृषि आयुक्तालय पुणे यांचे मा.सु. क्रमांक जा.क्र. कृआ/फलो४/सुसियो/ मा.सु./२६३५९ दिनांक २५/१०/२०२४

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (टप्पा-२) अंतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी विविध घटकांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने प्रकल्पांतर्गत **सूक्ष्म सिंचन** हा घटक राबविण्यासाठी संदर्भ क्र. १ नुसार आवश्यक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. यास अनुसरून खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

प्रकल्पांतर्गत सूक्ष्म सिंचन घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भ क्र. २ मधील मार्गदर्शक सूचनांच्या धर्तीवर संदर्भ क्र. १ मधील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार **संदर्भ क्र. २ मधील मार्गदर्शक सूचनांतील मुद्दा क्रमांक ७ मध्ये नमूद केलेल्या तरतुदी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (टप्पा-२) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सूक्ष्म सिंचन घटकास देखील लागू राहतील सदर तरतुदींचे पालन करून प्रकल्पांतर्गत सूक्ष्म सिंचन घटकाची अंमलबजावणी करण्यात यावी.** तसेच, संदर्भ क्र. २ मध्ये विहित केल्याप्रमाणे **नोंदणीकृत उत्पादक कंपन्यांनी** जिल्हास्तरावर सादर करावयाचे **परिशिष्ट-५ (अ)** व **परिशिष्ट-५ (ब)** तसेच **वितरकांनी** तालुका स्तरावर सादर करावयाचे **परिशिष्ट-५ (क), परिशिष्ट-५ (ड) व परिशिष्ट-५ (इ)** यांचा वापर करण्यात यावा. उत्पादक व वितरक यांनी सदर परिशिष्टे सादर करताना त्यांच्या राष्ट्रीय कृषी विकास योजना - प्रति थेंब अधिक पिक या योजने करिता नियमितपणे सादर करण्यात येणाऱ्या माहितीमध्ये प्रकल्पांतर्गत विक्री करण्यात आलेल्या सूक्ष्म सिंचन संचाच्या माहितीचा देखील समावेश करावा.

उक्त परिशिष्टांद्वारे प्राप्त झालेल्या माहितीची तसेच नोंदणीकृत विक्रेत्यांकडील साठा नोंदवहीची पडताळणी करून त्याबाबतचा **त्रैमासिक पडताळणी अहवाल** आपल्या स्तरावर प्राप्त करून घेण्यासंबंधी सर्व आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Minal Karanwal
Date: 04-08-2026
12:39:48

**(मिनल करनवाल)**
**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

प्रति- १. संचालक फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. उपविभागिय कृषी अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व).